प्रेसनोट

०६/०४/२०१९

# इंटनेटद्वारे (VOIP) कॉल करुन हॉटेल मध्ये बॉम्ब ठेवल्याची धमकी देणाऱ्यास सायबर पोलीस स्टेशन कडुन देहरादुन येथुन अटक

पुणे शहरातील पुणे – नगर रोडवरील हॉटेल फोर पॉईंट मध्ये दि.०६/०३/२०१८ रोजी सायंकाळी फोन क्रमांक – ००१५०६२३०३५८ व ००१२०५८२४६३१ या क्रमांकावरुन हॉटेल च्या लँडलाईन क्रमांकावर जैश ए मोहम्मद या अतिरेकी संघटनेतर्फे बोलत असल्याचे सांगुन हॉटेल मध्ये बॉम्ब ठेवले असुन हॉटेल मधील उपस्थित जेवढ्या लोकांना वाचवु शकता तेवढ्या लोकांना वाचवा असे हिंदी मधुन धमकीचे कॉल आले होते, सदरबाबत हॉटेल चे डायरेक्टर कॉर्पोरेट अफेअर म्हणुन काम पाहणारे इसम नामे विशाल कृष्णा पुजारी रा. पिंपळे सौदागर, पुणे यांनी लेखी तक्रार दिल्याने सदरबाबत विमानतळ पोलीस स्टेशन पुणे गुरनं १२६/१९ भादवि कलम ५०५(१)(ब), ५०६(२), ५०७ अन्वये गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्ह्यात तांत्रिक विश्लेषण व तपासात मदत करणेकामी विमानतळ पोलीस स्टेशन कडुन सायबर पोलीस स्टेशनला विनंती पत्र प्राप्त झाल्याने तांत्रिक माहितीचे आधारे व वेगवेगळ्या देशातील इंटरनेट कॉलची सुविधा पुरविणारे कंपन्यांकडुन वारंवार पाठपुरावा करुन सायबर पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी यांनी आरोपी बाबत खात्रीशीर माहिती मिळविली. मा. वरिष्ठांचे परवानगीने सायबर पोलीस स्टेशनचे तपास पथक देहरादुन, उत्तराखंड येथे जाऊन तेथुन आरोपी नामे चंद्रमोहन सिंह सुरियाल वडीलांचे नाव सुरतसिंह, वय – ३४ वर्ष, धंदा - व्यवसाय, रा. निलकंठ विहार, नेशविला रोड, महादेव मंदिराजवळ, देहरादुन, उत्तराखंड यास दि. ०५/०४/२०१९ रोजी देहरादुन येथुन अटक करुन त्याचे कडुन गुन्हा करणेसाठी वापरण्यात आलेले डी-लिंक कंपनीचे १ राऊटर/मोडेम व २ मोबाईल संच जप्त केले आहे. सदर आरोपीस देहरादुन येथील न्यायालयात हजर करुन त्याची ट्रान्झीट रिमांड घेवुन पुढील कारवाई कामी विमानतळ पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आला आहे.

आरोपीकडे तपास केला असता तो उच्चशिक्षित (बी.एस्सी, एम.बी.ए) असुन देहरादुन येथे मार्केट रिसर्चचा त्याचा व्यवसाय आहे. त्याने पुणे, नऱ्हे परिसरात राहणाऱ्या मित्राकडुन ४,५०,०००/- रक्कम उसनवारीवर घेतलेली होती व त्यास सदरची रक्कम परत करणेबाबत त्याचा मित्र वारंवार तगादा लावत असल्याने व त्याचे कडे रक्कम नसल्याने, काही दिवसांकरिता मित्राच्या त्रासांतुन मुक्तता मिळवण्यासाठी त्याने त्याच्या मित्राला एक इसम त्यास पैसे देणे आहे व तो पुणे येथे फोर पॉईंट हॉटेल मध्ये थांबलेला असल्याचे खोटे सांगुन हॉटेल मध्ये भेटण्यास जाण्यास सांगितले होते. परंतु नंतर त्याचा खोटे पणा मित्रास कळु नये म्हणुन व त्यास इंटरनेटचे चांगले ज्ञान असल्याने त्याने एक मोबाईल ॲप्लीकशन द्वारे **VOIP** कॉल करुन हॉटेल मध्ये बॉम्ब ठेवल्याचे धमकीचे कॉल केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.

वरील कामगिरी श्री. प्रदीप देशपांडे, अप्पर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. संभाजी कदम, पोलीस उपआयुक्त, आर्थिक व सायबर, श्री शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त, गुन्हे, व श्री निलेश मोरे, सहा पोलीस आयुक्त, आर्थिक व सायबर यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर कडील वरिष्ठ पोलीस निरिक्षक. सौ. राधिका फडके, पोलीस निरिक्षक जयराम पायगुडे, पो.हवा. अस्लम अत्तार, पोशि. राजकुमार जाबा, शाहरुख शेख, संतोष जाधव यांनी केली आहे.

**संभाजी कदम**
पोलीस उपआयुक्त,
आर्थिक व सायबर
पुणे शहर